# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड डि.सी.आर. दिनांक २३/०६/२०१८**

**दिनांक २३.०६.२०१८ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय अंतर्गत महिला सहाय्य कक्ष, नांदेड येथे जेष्ठ नागरीक तक्रार निवारण समिती व महिला तक्रार निवारण समिती बैठक संपन्न**

आज दिनांक २३.०६.२०१८ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड येथे जेष्ठ नागरीक तक्रार निवारण समिती व महिला तक्रार निवारण समिती बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये जेष्ठ नागरीकांची (०४) प्रकरणे ठेवण्यात आली होती. सदर प्रकरणांमध्ये जेष्ठ नागरीक समितीचे सदस्यांनी तक्रारदारांचे तक्रारीबाबत निवारण करुन त्यांना योग्यते मार्गदर्शन केले. चालु वर्षामध्ये जेष्ठ नागरीक समितीकडे एकुण (१७) प्रकरणे चौकशीसाठी प्राप्त झाली. ज्यापैकी (०४) प्रकरणात कायदेशिर कार्यवाही, (०४) प्रकरणात कौटुंबीक हिंसाचार संरक्षण कायदा अन्वये मदत, (०४) प्रकरणात आवश्यकती मदत केल्याने प्रकरण निकाली काढण्यात आले. (०२) प्रकरण पोलीस स्टेशनशी संबंधीत असल्याने ते सबंधीत पो.स्टे.ला वर्ग करण्या आले. (०१) प्रकरणात आपसात तडजोड घडवुन आणली असुन दोन प्रकरणे अभिलेखावर प्रलंबीत आहेत.

जेष्ठ नागरीक समितीचे अध्यक्ष मा. श्री. चंद्रकिशोर मीणा, पोलीस अधिक्षक, नांदेड हे असुन समिती सदस्यांमध्ये श्री. अशोक तेरकर, श्री. गंगाधर नायगांवकर, श्री. व्यंकटेश बुलबुले, श्री.व्यंकटेश पाटनुरकर, डॉ. श्री. हंसराज वैद्य, डॉ. पुष्पा कोकीळ, श्री. मिर्झा मुनीर बेग व समन्वय अधिकारी, श्री. सहाने, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड हे कामकाज पाहतात.

तसेच महिला तक्रार निवारण समितीकडे आज रोजी एकुण (१०) प्रकरणे चौकशीसाठी ठेवण्यात आलेली होती. ज्यामध्ये तक्रारदार महीलांना त्यांचे तक्रारीचे अनुषंगाने आवश्यकती मदत व मार्गदर्शन करुन त्यांचे तक्रारीचे निवारण करण्यात आले आहे. चालु वर्षामध्ये आजपावेतो महिला सहाय्य कक्षामध्ये एकुण (२७०) तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. ज्यामध्ये कक्षातील पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच महिला तक्रार निवारण समितीच्या सदस्यांनी (५१) प्रकरणात तडजोड घडऊन आणली, (४७) प्रकरणात महिलांना कायदेशिर कार्यवाहीसाठी मदत केली. (१२) प्रकरणात कौटुंबीक हिसाचार कायद्यान्वये मिळणारे संरक्षणकामी मदत केली. (९४) प्रकरणामध्ये महिलांना आवश्यकते मार्गदर्शन केल्याने त्यांनी स्वतंत्र निर्णय घेण्याची तयारी दर्शविलेली आहे. (०८) प्रकरणे पोलीस स्टेशनशी निगडीत असल्याने ती सबंधीत पोलीस स्टेशनला वर्ग करण्यात आली. उर्वरीत प्रकरणामध्ये पिडीत महिलांना आवश्यक मार्गदर्शन व मदत कक्षाकडुन करण्यात येत आहे.

महिला तक्रार निवारण समिती मध्ये १. ॲड. ज्योती कुलकर्णि, ०२. सौ. सुरेखा पाटणी, ०३. श्रीमती सुरेखा नेरलकर, ०४. डॉ. श्री. हंसराज वैद्य, ०५. श्री. आनंद कुलकर्णि, ०६. श्री. संतोष देवराये, ०७. श्री. शाहीद अन्वर जावेद अन्वर, ०८. श्री. गोपाळसिंह गुरुसिंह बिसेन हे काम करतात.

जेष्ठ नागरीक तक्रार निवारण व महिला तक्रार निवारण समितीची कामे महिला सहाय्य कक्षा अंतर्गत चालविण्यात येतात. सदर कक्षाचे प्रमुख सौ. प्रभा पुंडगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक हे कामकाज पाहतात. त्यांचे मदतीस पोना/२०८३ दत्तराम जाधव, मपोना/२०३१ पंचफुला फुलारी, मपोना/१४०१ विमल पोतदार, मपोशि/२९७५ शेख अमरीन, मपोशि/३१२४ सिमा जोंधळे हे काम करतात.

महिला तक्रार निवारण समितीची बैठक दर महिण्याचे दुसरे व चौथे शनीवारी तसेच जेष्ठ नागरीक तक्रार निवारण समितीचे कामकाज दर महिण्याचे चौथे शनीवारी पोलीस अधिक्षक कार्यालयातील महिला सहाय्य कक्षामध्ये आयोजीत करण्यात येते.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.